ठाणे वनवृत्ताअंतर्गत रोहा वनविभागांतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समितीची निवड करुन त्यांचेमार्फत आपटा बीज भांडवल (Seed Money) बाबतच्या कामाकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.आपटा-२०१८/प्र.क्र.१८१/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २२ मार्च, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र. कक्ष १/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३८/२६८/२०१८-१९, दि. १९.०५.२०१८ रोजीचे पत्र.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५,दि. ३१.०१.२०१९
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३,दिनांक ०८ मार्च, २०१९
६. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.आपटा-२०१८/प्र.क्र.१८१/फ-९, दिनांक २४ मे, २०१८

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६- ०४६१) या योजनेकरीता रू. १.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. सदर योजनेंतर्गत आठमाही सुधारित अंदाज सन २०१८-१९ पत्रकानुसार रुपये ०.९० लक्ष नियतव्यय मंजुर व अर्थसंकल्पित आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता निधी वितरण /पुनर्विनियोजन प्रस्तावाच्या अनुषंगाने निधीचे वितरण करण्यात यावे, असे आदेश आहेत. सदर निधी वितरित करतांना दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिशिष्टातील अटीची पूर्तता व दिनांक २५.०१.२०१९ मधील सूचनांचे पालन करण्याचे कळविले आहे. सदर योजनेंतर्गत संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये रु.०.७० लक्ष इतक्या निधीस शासन मंजूरी प्रदान केली आहे. आता वित्त विभागाच्या सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत ०.२० लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी शिल्लक आहे.

अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने रु.१.०० लक्ष रकमेचा ठाणे वनवृत्ताकडून उप वनसंरक्षक, रोहा त्यांनी त्यांचे वनविभागांतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समितीची निवड करुन त्यांचेमार्फत आपटा बीज भांडवल (Seed Money) बाबतच्या कामाकरीता चालू बाब प्रस्ताव संदर्भ क्र.२ येथील दिनांक १९.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६-०४६१) या योजनेतून आठमाही सुधारित अंदाज सन २०१८-१९ पत्रकानुसार व वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ रोजीचे परिपत्रक विचारात घेता रू.०.२० लक्ष इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.२ वरील दिनांक १९.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६-०४६१) या योजनेतून सन २०१८-१९ आठमाही सुधारित अंदाजपत्रक व वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ रोजीचे परिपत्रक विचारात घेता, प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, सन २०१८-१९ राज्य योजनेअंतर्गत रोहा वनविभागांतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समितीची निवड करुन त्यांचेमार्फत आपटा बीज भांडवल (Seed Money) बाबतच्या कामाकरीता रु.०.२० लक्ष (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) इतका निधी (४४०६-०४६१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.
३. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
४. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
५. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही याची सर्व जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांची राहील.
६. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.
७. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.
८. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

९. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८,२५.०१.२०१९, ३१.०१.२०१९ व ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१०.शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

११.सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१२.वितरित केलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही.

उपरोक्त खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शिर्ष- २४०६, वनिकरण व वन्यजीवन, (०१) (०२) शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६-०४६१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करीता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२२१७०११७४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b1fa488256513b9e2a5b0085040486cc2b67ff77bb697c031c8d3ba4aaf6e350, postalCode=400032, street=4 TH FLOOR,MANTRALAYA ANNEXURE BLDG,MADAM CAMA ROAD,MUMBAI, serialNumber=1e8a52fc7907817fd27a6f930b32f785394ccf71e961f74377a96cf067b3d824, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIJAYKUMAR VASUDEO PATIL
Date: 2019.03.22 17:27:58 +05'30'

(वि. वा. पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
५. उप वनसंरक्षक, रोहा.
६. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)